जा.क्र.मा.सं./प्रेस नोट / १०० /2021
मानव संसाधन शाखा, सिंधुदुर्ग
दिनांक :- 22.01.2021

# प्रेस नोट

## सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस कल्याण निधीस वस्तु स्वरुपात देणगी दिलेल्या Water Dispenser Machine चे वाटपाबाबत

संपुर्ण जगासह भारतात कोरोना विषाणूचा (कोविड-19) प्रादुर्भाव सुरू असून कोरोना संसर्ग रोखण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार अहोरात्र कर्तव्य बजावित आहेत. अशा परिस्थीतील पोलीस अधिकारी व अंमलदारांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये याकरीता उपाययोजना राबविण्यासाठी सिंधुदुर्ग पोलीस कल्याण निधीचा भाग म्हणून वस्तू स्वरुपात देणगी देण्याबाबत आवाहन करण्यात आलेले होते.

सदर आवाहनास प्रतिसाद देऊन एका सेवाभावी संस्थेने 15 Water Dispenser Machine सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकास देणगी स्वरुपात दिलेल्या आहेत. सदर मशिनमधून गरम, कोमट व थंड पाणी तात्काळ उपलब्ध होते.

सदर Water Dispenser Machine चे मा.श्री.राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचेहस्ते आज दि.22.01.2021 रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे वाटप करण्यात आले. सदर Water Dispenser Machine जिल्ह्यातील सर्व 13 पोलीस ठाणेंना प्रत्येकी 1, पोलीस मुख्यालयास 1 व पोलीस अधीक्षक कार्यालयास 1 अशा देण्यात आलेल्या आहेत.

तरी सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कर्तव्य बजावताना कोरोना विषाणूच्या अनुषंगाने खबरदारी घेऊन पिण्याचे पाण्यासाठी सदर मशिनचा वापर करुन आवश्यकतेप्रमाणे आपणास गरम, कोमट, थंड पाणी घ्यावे आणि आपल्या प्रकृतीचा काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी केलेले आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलास देणगी स्वरुपात 15 Water Dispenser Machine दिल्याबद्दल सदर सेवाभावी संस्थेचे मा.पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी आभार व्यक्त केलेले आहेत.

( एस. बी. गावडे )
प्र. पोलीस उपअधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग

22/01/2021

प्रति,

मा. जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग